# Study Circle Career Development Institute

# AMC
# Paper 2017

**A**

**Time : 1 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**सहाय्यक आयुक्त (विभाग अधिकारी), बृहन्मुंबई महानगर पालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, मुंबई चाळणी परीक्षा**

**व्यवस्थापन, नगररचना व कायेदविषयक ज्ञान (१० जून २०१७) (A)**

१) ७४ वी घटनादुरुस्ती कायदा १९९२ नुसार मोठ्या शहराची (महानगर) लोकसंख्या किती निश्चित करण्यात आली आहे?

a) १० लाख किंवा अधिक
b) २० लाख किंवा अधिक
c) ५० लाख किंवा अधिक
d) १ कोटी किंवा अधिक

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a)
(2) फक्त (b)
(3) फक्त (c)
(4) (a), (b), (c) आणि (d) हे सर्व

---

२) हर्झबर्गच्या प्रेरणा–स्वच्छता सिद्धांतात संस्था धोरण, प्रशासन, देखरेख, कामाची स्थिती आणि पगार काय म्हणून दर्शविले आहे?

(1) यश घटक
(2) प्रेरणा देणारे घटक
(3) आदर घटक
(4) स्वच्छता घटक

---

३) ''ग्रामपंचायत संघटित करणे, तिला आवश्यक ते अधिकार बहाल करणे आणि ती स्वयंशासनाचे एक युनिट म्हणून कार्य करणे याबाबत राज्यशासन पुढाकार घेऊ शकेल.'' ही तरतूद खालीलपैकी यामध्ये नमूद करण्यात आली आहे.

(1) घटनेचा भाग I
(2) घटनेचा भाग IV A
(3) घटनेचा भाग III
(4) घटनेचा भाग IV

---

४) जेव्हा एक असुरक्षित कर्मचारी निर्णय घेण्याच्या भीतीमुळे प्रत्येक बाबीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यावर अवलंबून राहतो आणि एक वरिष्ठ अधिकारी असे निर्णय घेतो जे त्यांनी अगोदरच कनिष्ठांवर सोपविले आहे, तर हे व्यवस्थापनाच्या खालीलपैकी कोणत्या तत्त्वाचे उल्लंघन आहे?

(1) आदेश ऐक्यता
(2) नियंत्रण व्याप्ती
(3) अपवाद
(4) प्रमाणता

---

५) बलवंतराय मेहता समितीनुसार जिल्हा अधिकारी हा असा असेल.

(1) जिल्हा परिषदेच्या बाहेरचा
(2) जिल्हा परिषदेच्या मतदान विरहित सभासद
(3) जिल्हा परिषदेमध्ये मतदान करण्याचा हक्क असलेला सभासद
(4) जिल्हा परिषदेचा चेअरमन (सभाध्यक्ष)

---

६) एका अंतर–कार्य (क्रॉस फंक्शनल) संस्थात्मक संरचनेत, ज्याच्यात एक कर्मचारी लेखा खात्यांतल्या वरिष्ठ अधिकाऱ्याखाली काम करतो तसाच तो एका भौगोलिक खात्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्याही खाली काम करतो. अशा संस्थात्मक संरचनेस काय म्हणतात?

(1) ओळ संघटना
(2) मॅट्रिक्स संघटना
(3) अनौपचारिक संघटना
(4) नोकरशाही संघटना

---

७) हेन्री मिंट्झबर्गनुसार एक व्यवस्थापक तीन प्रकारच्या भूमिका निभावतो, खालीलपैकी कोणती भूमिका या तीन प्रकारात समाविष्ट नाही?

(1) पर्यवेक्षकीय भूमिका
(2) आंतर–वैयक्तिक भूमिका
(3) निर्णय–केंद्रित भूमिका
(4) माहिती–केंद्रित भूमिका

---

८) खालीलपैकी कोणते नियंत्रणाचे तंत्र नाही?

a) अंदाजपत्रक
b) व्यवस्थापन माहिती पद्धती
c) स्वॉट विश्लेषण
d) पी.ई.आर.टी. आणि सी.पी.एम.

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a) (2) (b) आणि (c) दोन्हीही (3) फक्त (c) (4) (c) आणि (d) दोन्हीही

---

९) सार्वजनिक संस्थांच्या प्रमुख समस्या कोणत्या?

a) सार्वजनिक उत्तरदायित्व b) व्यवस्थापनाची स्वायत्तता c) संचालक मंडळाची रचना

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a) (2) (b) आणि (c) दोन्हीही (3) फक्त (c) (4) (a), (b) आणि (c)

---

१०) खालीलपैकी कोणत्या मॉडेलप्रमाणे एक नेत्याचे काम संस्थात्मक संरचना, समर्थन व बक्षीस यांचा वापर करून आपल्या दुय्यम कर्मचाऱ्यांना संघटनात्मक ध्येय साध्य करण्यासाठी प्रोत्साहित करणे आहे?

(1) उद्दिष्ट्ये प्रणीत व्यवस्थापन (MBO)
(2) मार्ग – ध्येय मॉडेल (इवॅन्स)
(3) नेतृत्व – गुण मॉडेल
(4) आकस्मिक मॉडेल

---

११) एक नगरसेवक स्वतःच्या वैद्यकीय उपचारासाठी परदेशी गेल्या कारणास्तव महानगरपालिकेच्या सभेस सलग सहा महिने उपस्थित राहू शकला नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, अंतर्गत

(1) महानगरपालिकेने सुट्टी मंजूर केली असली तरी त्या नगरसेवकाचे पद रद्द होईल.
(2) महानगरपालिकेने सुट्टी पूर्व–मंजूर केली नसल्यास त्या नगरसेवकाचे पद रद्द होईल.
(3) महानगरपालिकेने सुट्टी मंजूर करेपर्यंत त्या नगरसेवकाचे पद रद्द होईल.
(4) नगरसेवक कोणत्याही शिक्षेस प्राप्त नाही.

---

१२) जर महापालिका अंतिम कालावधीपूर्वी बरखास्त झाली तर तिची निवडणूक खालील कालावधीमध्ये घेतली जाते.

(1) तीन महिने (2) सहा महिने (3) नऊ महिने (4) एक वर्ष

---

१३) खालीलपैकी कोणते एक कार्य नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर अनिवार्य नाही?

(1) सार्वजनिक रुग्णालयांची देखभाल
(2) सार्वजनिक बागांची देखभाल
(3) प्राथमिक शाळा स्थापना
(4) आक्षेपार्ह व्यवहार आणि व्यवसाय नियमन

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

१४) कॅन्टोनमेंट बोर्ड संदर्भात हे विधान अचूक आहे.

a) आपल्या देशात ब्रिटिशांकडून पूर्वपरंपरागत चालत आलेली महानगरपालिका प्रशासनाची पद्धत आहे.

b) संरक्षण मंत्रालयाच्या अधिकारात ठराव पास करून स्थापना करण्यात आली आहे.

c) त्यावर संरक्षण मंत्रालयाचे प्रत्यक्ष नियंत्रण असते.

d) कॅन्टोनमेंट बोर्डामध्ये फक्त निवडून आलेल्या सभासदांचा समावेश असतो.

**पर्यायी उत्तरे –**

(1) (a) आणि (b) (2) (b), (c) आणि (d) (3) (a) आणि (c) (4) (c) आणि (d)

---

१५) पंचायत राज ही खालीलपैकी कोणती प्रणाली आहे?

(1) स्थानिक सरकार (2) स्थानिक प्रशासन

(3) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (4) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था

---

१६) कोणत्या प्रकारची योजना संघटनेतील कमी पातळीमध्ये घडणाऱ्या विशिष्ट कृती आणि प्रकियांवर केंद्रित आहे?

(1) आकस्मिक योजना (2) कार्यरत योजना (3) रणनीतिक खेळ योजना (4) धोरणात्मक योजना

---

१७) कामाचे मूल्यमापनाच्या कोणत्या प्रणालीमध्ये वरिष्ठ आणि कनिष्ठ एकत्रितरीत्या विशिष्ट प्राप्य उद्दिष्टांवर सहमत होतात आणि एकत्रितपणे या उद्दिष्टाचे अंतिम मुदत ठरवितात?

(1) ३६० डिग्री मूल्यमापन (2) उद्दिष्ट केंद्रित व्यवस्थापन

(3) प्रशासकीय कार्य मूल्यमापन (4) कर्मचाऱ्याचे स्वयं मूल्यमापन

---

१८) पंचायती राज ही यासारखी पद्धती आहे –

(1) स्थानिक शासन (2) स्थानिक प्रशासन (3) स्थानिक स्वयंशासन (4) धोरणात्मक योजना

---

१९) कोणत्या अभिप्रेरणांनी कर्मचारी प्रेरित होतात?

a) प्राथमिक अभिप्रेरणा b) दुय्यम अभिप्रेरणा c) मूलभूत अभिप्रेरणा d) साध्य अभिप्रेरणा

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a), (c) आणि (d) (4) (b) आणि (d) दोन्हीही

---

२०) व्यवस्थापनाच्या 'नियंत्रण कार्यात' खालीलपैकी कोणती बाब समाविष्ट नसते?

(1) मानक निश्चित करणे (2) कामगिरीचे मोजमाप करणे

(3) तुलना करणे (4) नियोजन करणे

---

२१) पंचायत समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी कोण आहे?

(1) उपविभाग अधिकारी (2) गट विकास अधिकारी (3) जिल्हाधिकारी (4) तहसीलदार

---

२२) ग्रामीण स्थानिक शासनाची पंचायती राज रचना ही प्रथम कोणी अवलंबली?
(1) राजस्थान आणि मध्य प्रदेश
(2) आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल
(3) राजस्थान आणि आंध्र प्रदेश
(4) आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेश

---

२३) काही व्यक्तींमध्ये जन्मतः अशी काही वैशिष्ट्ये असतात ज्यावरून त्या व्यक्तीला नेतृत्व करताना भरपूर यश प्राप्त होते, असे खालीलपैकी नेतृत्वाविषयी कोणते सिद्धांत सांगते?
(1) थोर व्यक्ती सिद्धांत (2) विशेष गुण सिद्धांत (3) व्यवहारिक सिद्धांत (4) आकस्मिक सिद्धांत

---

२४) १९११ मध्ये 'प्रिन्सिपल्स ऑफ सायन्टिफिक मॅनेजमेंट' हे पुस्तक खालीलपैकी कोणी लिहिले?
(1) हेन्री फेयॉल (2) फ्रेड्रीक डब्ल्यू. टेलर (3) कून्टझ व ओ'डोन्नेल (4) वरीलपैकी कुणीही नाही

---

२५) कोणत्या नियंत्रण व्यवस्थेत एक पूर्ण क्रियाकलापाविषयी माहिती गोळा करून त्याचे मूल्यमापन केले जाते आणि त्या आधारे भविष्यात तत्सम क्रियाकलाप सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातात?
(1) धोरणात्मक नियंत्रण (2) भविष्य सकस नियंत्रण (3) अभिप्राय नियंत्रण (4) समवर्ती नियंत्रण

---

२६) ७४ वी घटना दुरुस्ती कायदा १९९२ मध्ये सुधारणा केव्हा झाल्या?
a) १ एप्रिल १९९२ b) २० एप्रिल १९९२ c) २० एप्रिल १९९३ d) २६ जानेवारी १९९२
**पर्यायी उत्तरे –**
(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) फक्त (c) (4) वरीलपैकी एकही नाही

---

२७) ई–शासनाचे कोणते मॉडेल ICT आणि एक केंद्राभिमुख माध्यमांचा वापर करून मौल्यवान माहिती सार्वजनिकरीत्या प्रसार करण्यासाठी विकसित करण्यात आली आहे?
(1) गंभीर प्रवाह मॉडेल
(2) प्रसारण मॉडेल
(3) संवादी सेवा मॉडेल
(4) मोबिलायझेशन आणि लॉबिंग मॉडेल

---

२८) महानगरपालिकेच्या सभासदत्वासाठी किमान वयोमर्यादा किती आवश्यक आहे?
a) १८ वर्षे b) २० वर्षे c) २१ वर्षे d) २५ वर्षे
**पर्यायी उत्तरे –**
(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) फक्त (c) (4) फक्त (d)

---

२९) आधुनिक प्रतिसाद प्रशासन प्रक्रियेत
(1) प्रशासन जनतेस उतरंड (hierarchical) संरचनेमार्फत जबाबदार आहे.
(2) प्रशासन जनतेस लोक प्रतिनिधींच्यामार्फत जबाबदार आहे.
(3) प्रशासन जनतेला थेट शासन प्रक्रियेत भाग घेण्यासाठी सक्षम करते.
(4) प्रशासन सरकारी कार्यक्रम व मोहिमांमध्ये जनतेने दिलेल्या विचारांना (inputs) महत्त्व देते.

---

३०) व्यक्ती आणि खात्यांमधील आंतर–संबंध जो अहवाल आणि जबाबदारीचे संबंध दर्शवितो त्या संरचनेला काय म्हणतात?
(1) आदेश साखळी (2) कार्यनिहाय संरचना (3) विशेषीकरण (4) संस्थात्मक संरचना

---

३१) विशिष्ट भविष्य कालावधीसाठी उत्पन्न व खर्चाचा अंदाज करून तक्ता तयार करणे याला ...... म्हणतात.
(1) वेळेचा अंदाजपत्रक (2) प्रमुख अंदाजपत्रक (3) कार्यरत अंदाजपत्रक (4) आर्थिक अंदाजपत्रक

---

३२) अंदाजपत्रक हे व्यवस्थापनाच्या ...... एक महत्त्वाचे साधन आहे.
(1) अभिप्रेरणेतील (2) संघटनेतील (3) निर्णय प्रक्रियेतील (4) संदेशवहनातील

---

३३) संघटनेमध्ये अंदाजपत्र नियंत्रण पद्धतीची गरज असते, कारण......
(1) व्यवस्थापन कर्मचाऱ्यांवर वचक ठेवू इच्छितात.
(2) व्यवस्थापनाचे हेच काम आहे.
(3) अंदाज करणे, कामाची अंमलबजावणी करणे व दुरुस्तीचे उपाय करणे, त्यामुळे नफावृद्धी होते.
(4) *अति उच्च नफा कमावणे हा संघटनेचा उद्देश असतो.*

---

३४) भूतकाळातील कार्यक्षमतेच्या आधारावर प्रभावित होऊन केलेल्या कार्य मूल्यमापनास ...... असे म्हणतात.
(1) हॉर्न परिणाम (2) हॅलो परिणाम (3) स्पीलओव्हर परिणाम (4) यापैकी काहीही नाही

---

३५) संघटनेमध्ये लवचीक अंदाजपत्रक तयार केला जातो –
(1) कार्याच्या (उत्पादनाच्या) वेग–वेगळ्या स्तरासाठी (2) वेग–वेगळ्या विभागासाठी
(3) वेग–वेगळ्या काळासाठी (4) वरीलपैकी सर्वांसाठी

---

३६) ...... म्हणजे समर्थ आणि कार्यक्षम व्यक्तींना पसंत करण्याची कार्य प्रक्रिया आहे.
(1) भरती (2) निवड (3) नेमणूक (4) कार्यसिद्धी मूल्यमापन

---

३७) शासकीय संस्थेमधील कर्मचाऱ्याचे कार्य मूल्यमापन करण्याची पद्धत
(1) गोपनीय अहवाल (2) सहकारी कर्मचाऱ्यांचे मत
(3) तपासणी यादी (4) मोजमापन अहवाल

---

३८) राष्ट्रीय पूर मंडळ ज्याची १९७६ साली स्थापना झाली त्यांचा विश्वास आहे की अलीकडच्या वर्षात पुरांचे प्रमाण वाढले आहे त्याला खालीलपैकी कोणते कारण/कारणे जबाबदार आहे/आहेत?
a) जंगलतोड b) जलनिःसारणासाठी अपुरी जागा c) नदीवर धरणे बांधणे
**पर्यायी उत्तरे –**
(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (a) आणि (c) (3) फक्त (a) *(4) (a), (b) आणि (c)*

---

३९) मॉस्लोचा कर्मचारी अभिप्रेरणेचा सिद्धांत ...... अवलंबून आहे.
(1) पगारावर (2) सुविधांवर (3) श्रेणीबद्ध गरजांवर (4) वरीलपैकी सर्वांवर

---

४०) शून्याधारित अंदाजपत्रक तंत्र सर्वप्रथम ...... या देशाने राबविले
(1) इंग्लंड (2) अमेरिका (3) भारत (4) जपान

---

४१) शून्याधारित अंदाजपत्रक खालील कोणत्या मूलभूत गृहीतकावर आहे?
(1) गतवर्ष हे मूळ वर्ष म्हणून गृहित धरले जात नाही. (2) प्रत्येक वर्ष हे नवीन वर्ष असते.
(3) खर्चाचा अंदाज करताना शून्य आधार मानला जातो. (4) वरीलपैकी सर्व

---

४२) विविध प्रशासकीय कार्ये सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक रकमेचे पूर्वानुमान करण्याच्या उद्देशाने तयार केलेले अंदाजपत्रक म्हणजे ...... होय.
(1) विक्री आणि वितरण अंदाजपत्रक (2) भांडवली खर्च अंदाजपत्रक
(3) उत्पादन खर्च अंदाजपत्रक (4) प्रशासकीय खर्च अंदाजपत्रक

---

४३) संघटनेमध्ये कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यासाठी व्यवस्थापन करते (अवलंबते).
(1) कर्मचाऱ्यांचा उच्च पगार (2) कामात खंड (आराम) (3) कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण (4) कमी कार्यक्षमतेला शिक्षा

---

४४) भारतामध्ये मनुष्यबळ अंकेक्षण करणे हे ...... आहे.
(1) अनिवार्य (2) ऐच्छिक (3) गरजेचे (4) वैधानिक

---

४५) मॅक्ग्रेगरचा सिद्धांत 'वाय' नुसार कर्मचारी ......
(1) निर्मितिक्षम असतात. (2) जबाबदारी स्वीकारायला तयार असतात.
(3) काम पूर्ण केल्यानंतर समाधानी होतात. (4) वरील सर्व

---

४६) संघटनेसाठी लागणाऱ्या भविष्यातील मानव संसाधन गरजेचा अंदाज करणे म्हणजे ...... प्रक्रिया होय.
(1) बढती (2) नेमणूक (3) भरती (4) मानव संसाधन नियोजन

---

४७) कर्मचाऱ्यांचे कार्य मूल्यमापन करणे हे ...... याचा भाग आहे.
(1) मानवी संसाधन व्यवस्थापन (2) आर्थिक व्यवस्थापन
(3) विपणन व्यवस्थापन (4) वितरण व्यवस्थापन

---

४८) ...... या मुलाखतीस प्रमाणित मुलाखत असेही म्हणतात.
(1) संरचित (2) गट (3) असंरचित (4) वैयक्तिक

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Study CIRCLE

४९) नोकरीचा नुकताच राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्यांची घेतलेल्या मुलाखतीला ...... मुलाखत म्हणतात.
(1) सखोल मुलाखत (2) वैयक्तिक मुलाखत (3) निर्गमन मुलाखत (4) अनौपचारिक मुलाखत

५०) अभिप्रेरणा संदर्भातील ई.आर.जी. सिद्धांत ...... यांनी विकसित केला.
(1) मॅस्लो (2) क्लेटॉन अल्डरफर्स (3) डग्लस मॅकग्रेगर (4) विल्यम औची

५१) सार्वजनिक, खाजगी भागीदारीची खालीलपैकी कोणती उद्दिष्ट्ये असतात?
a) प्रकल्पाचा आराखडा तयार करणे, प्रकल्प पूर्ण करणे. b) प्रकल्पाला वित्त पुरवठा करणे.
c) प्रकल्प पूर्ण करणे, अंमलबजावणी करणे. d) प्रकल्प मंजूर करमे.
**पर्यायी उत्तरे –**
(1) फक्त (a) आणि (b) (2) (a), (b) आणि (c) (3) फक्त (d) (4) सर्व बरोबर आहेत

५२) विविध प्रकारच्या संघटनांच्या संबंधी खालील विधाने विचारात घ्या :
a) कार्यात्मक संघटन, प्रकल्प संघटन आणि मॅट्रिक्स संघटन या प्रमुख तीन परंपरागत संघटनांची कार्यक्षमता आजही प्रकल्प व्यवस्थापन रचनेत आहे.
b) औपचारिक संघटन, रेखा संघटन, रेखा आणि कर्मचारी संघटन या प्रमुख तीन परंपरागत संघटनांची कार्यक्षमता आजही प्रकल्प व्यवस्थापन रचनेत आहे.
वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत?
**पर्यायी उत्तरे –**
(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) दोन्ही (4) वरीलपैकी कोणतेही नाही

५३) खालीलपैकी कोणतेही दोन पक्ष सार्वजनिक–खाजगी भागीदारीचे भागीदार असतात?
a) सरकारी आणि सार्वजनिक कंपनी b) सरकारी प्रतिनिधी (एजन्सी) आणि सार्वजनिक कंपनी
c) सरकारी प्रतिनिधी (एजन्सी) आणि खाजगी कंपनी d) सार्वजनिक कंपनी आणि खाजगी कंपनी
वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत?
(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b) आणि (d) (3) फक्त (c) (4) सर्व बरोबर आहेत

५४) खालीलपैकी कोण मुंबई महानगरीय प्रदेश विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत?
(1) शहर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य (2) मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
(3) राज्यमंत्री, शहर विकास, महाराष्ट्र राज्य (4) घरबांधणी मंत्री, महाराष्ट्र राज्य

५५) प्रकल्पाच्या यशासंबंधी पुढील विधाने विचारात घ्या.
a) प्रकल्प यशस्वी होतो जेव्हा लाभार्त्यांच्या गरजांचा विचार केला जातो.
b) प्रकल्प यशस्वी होतो जेव्हा ग्राहकांच्या गरजांचा विचार केला जातो.
वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत?
(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) दोन्ही (4) वरीलपैकी कोणतेही नाही

५६) प्रकल्प विकास चक्रासंबंधी खालील विधाने विचारात घ्या :

a) प्रकल्प विकासाचे चक्र या तीन अवस्थांशी संबंधित आहे, पूर्व गुंतवणूक टप्पा, अंमलबजावणी टप्पा आणि कार्यात्मक टप्पा.

b) प्रकल्प विकासाचे चक्र या तीन अवस्थांशी संबंधित आहे, नियोजन टप्पा, नियंत्रण टप्पा आणि संचालन टप्पा.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत?

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) (a) आणि (b) दोन्ही (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

५७) बांधा, वापरा व हस्तांतर करा. या प्रकल्प वित्त पद्धतीचा/पद्धतीचे फायदा/फायदे पुढीलप्रमाणे आहे/आहेत.

a) खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे. b) देशातील परदेशी भांडवल गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे.

c) नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करणे. d) प्रकल्प खर्च कमी करणे.

वरीलपैकी कोणते पर्याय **बरोबर** आहेत?

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b) आणि (c)

(3) (a), (b) फक्त (c) (4) सर्व बरोबर आहेत

---

५८) प्रकल्प व्यवस्थापनाच्या गुणवत्तेसंबंधी पुढील विधाने विचारात घ्या :

a) प्रकल्प व्यवस्थापनाची गुणवत्ता बहुतेककरून जागतिक पर्यावरणावर अवलंबून असते.

b) प्रकल्प व्यवस्थापनाची गुणवत्ता बहुतेककरून स्थानिक पर्यावरणावर अवलंबून असते.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत?

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) (a) आणि (b) दोन्ही (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

५९) टीकात्मक मार्ग पद्धत सामान्यतः खालील प्रकारच्या प्रकल्पासाठी वापरली जाते.

a) बांधकाम, अवकाश आणि संरक्षण प्रकल्प

b) उत्पादन विकास आणि संशोधन विकास प्रकल्प

c) अभियांत्रिकी आणि कारखाना देखभाल प्रकल्प

d) एकमेकावर आधारित कृतीचे सर्व प्रकल्प

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत?

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b) आणि (c)

(3) फक्त (d) (4) सर्व विधाने बरोबर आहेत

---

६०) 'टीकात्मक मार्ग पद्धत' हे प्रकल्प प्रारूप तंत्र खालीलपैकी कोणत्या हेतूसाठी वापरले जाते?

a) प्रकल्पाचे नियंत्रण करण्यासाठी b) प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्यासाठी

c) प्रकल्प वित्त पुरवठ्यासाठी d) प्रकल्पाचे अंदाजासाठी

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत?

(1) (a) आणि (b) दोन्ही (2) (c) आणि (d) दोन्ही

(3) फक्त (a) (4) (a) आणि (d) दोन्ही

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Study CIRCLE

६१) पुढीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे?

a) २६ जानेवारी २००१ रोजी गुजरातने ८.१ रिश्टर स्केलचा सर्वात वाईट भूकंप अनुभवला.

b) भूजपासून ईशान्येकडे २० कि.मी. जवळ भूकंप केंद्र होते.

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b) (3) फक्त (b) (4) एकही नाही

---

६२) महाराष्ट्रात लातूर जिल्ह्यात भूकंप कधी झाला?

(1) २९ सप्टेंबर १९९३ (2) ३० ऑक्टोबर १९९३ (3) ३० सप्टेंबर १९९३ (4) २९ ऑक्टोबर १९९३

---

६३) खालीलपैकी कोणत्या राज्याचा संबंध आवर्ताशी संबंधित नैसर्गिक आपत्तीशी नाही?

(1) तामिळनाडू (2) ओरिसा (3) गुजरात (4) कर्नाटक

---

६४) महाराष्ट्र सरकारने जिल्हा आपत्ती नियोजन केंद्राची स्थापना ...... वर्षी केली.

(1) ऑगस्ट १९९६ (2) जानेवारी १९९६ (3) मे १९९५ (4) जानेवारी १९९५

---

६५) पुढे दिलेल्या भूकंप आपत्तीबाबत कोणती विधाने बरोबर आहेत? पर्यायी उत्तरातून योग्य पर्याय निवडा.

a) १७ जानेवारी १९९५ – कोबे, जपान

b) ३० मे १९९८ – अफगाणिस्तान

c) २९ मार्च १९९९ – उत्तर प्रदेश, भारत

d) २६ जानेवारी २००१ – महाराष्ट्र, भारत

**पर्यायी उत्तरे –**

(1) (a), (b) आणि (d) (2) (a), (b) आणि (c) (3) (b), (c) फक्त (d) (4) (a), (c) आणि (d)

---

६६) महाराष्ट्रातील दुष्काळ प्रवण प्रदेशात ...... मि.मी. वार्षिक पाऊस पडतो.

(1) १००० ते १५०० मि.मी. (2) ७५० ते ८५० मि.मी. (3) ६०० ते ७५० मि.मी. (4) ८५० ते ९५० मि.मी.

---

६७) गेल्या ३०० वर्षात भारतातील खालीलपैकी कोणता भूकंप सर्वात जास्त विध्वंसक होता?

(1) शिलाँग १९८७ (2) कांग्रा १९०५ (3) भूज २००१ (4) उत्तरकाशी १९९१

---

६८) खालीलपैकी कोणता शासकीय विभाग दुष्काळ नियोजनाविषयी प्रमुख विभाग आहे?

(1) केंद्रीय शेती विभाग (2) केंद्रीय पर्यावरण विभाग (3) केंद्रीय अर्थ विभाग (4) वरील सर्व

---

६९) पुढीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे?

a) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ही गृह मंत्रालयाची प्रमुख संस्था आहे.

b) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा अध्यक्ष गृहमंत्री असतो.

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

---

७०) ...... किलोमीटर किंवा अधिक व्यास असलेला प्रत्यावर्त हा पृथ्वीवरील एक अत्यंत विनाशकारी आणि धोकादायक वातावरणीय झंझावात आहे.

(1) ४०० कि.मी. (2) ६०० कि.मी (3) ८०० कि.मी. (4) १००० कि.मी.

---

७१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार, प्रत्येक नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या आधिपत्याखालील क्षेत्रासाठी ...... तयार करणे बंधनकारक आहे.

(1) विकास योजना (2) प्रादेशिक योजना (3) आर्थिक योजना (4) मास्टर प्लॅन

---

**७२)** अर्कि. ली कारबुझार यांनी 'चंदीगड शहर' ...... आकारात निर्मिती/रचना केली.

*(1) मनुष्य शरीर* (2) प्राणी शरीर (3) पक्षी शरीर (4) वरीलपैकी नाही

---

७३) किनारपट्टी नियमन क्षेत्रासाठीच्या दि. ६ जानेवारी २०११ च्या अधिसूचनेनुसार, सी.आर.झेड.–III क्षेत्रात

(1) फक्त अस्तित्वातील रस्त्याचे जमिनीच्या बाजूस इमारत बांधकाम अनुज्ञेय होईल.

(2) अस्तित्वातील रस्त्याचे जमिनीच्या बाजूस किंवा अस्तित्वातील अधिकृत बांधकामाचे जमिनीच्या बाजूस इमारत बांधकाम अनुज्ञेय होईल.

(3) फक्त अस्तित्वातील अधिकृत बांधकामाचे जमिनीच्या बाजूस इमारत बांधकाम अनुज्ञेय होईल.

(4) उच्चतम भरती रेषेपासून २०० ते ५०० मी. क्षेत्रातील पारंपारिक अधिकार व नेहमीचा वापर यांच्या कक्षेत येणाऱ्या क्षेत्रात, काही शर्तींना अधीन राहून जमिनीच्या बाजूस इमारत बांधकाम अनुज्ञेय होईल.

---

७४) माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार प्रथम अपील जास्तीत जास्त किती दिवसात निकाली काढणे आवश्यक आहे?

(1) ४५ दिवस (2) ३० दिवस (3) ९० दिवस (4) ६० दिवस

---

७५) बृहन्मुंबईच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली–१९९१ च्या तरतुदीनुसार खालील व्यक्ती/संस्था यांचेकडून सादर होणारा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हा प्राधान्याने स्वीकारण्यात येईल.

(1) जमिनीचे मालक

(2) फक्त जागेवरील झोपडपट्टीधारकांची नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था

(3) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ

(4) जागेवरील झोपडपट्टीधारकांची प्रस्तावित किंवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था

---

७६) भारतातील नवीन सुनियोजित शहर तथा आंध्रप्रदेशाच्या राजधानीचे वास्तविक शहर

(1) अमरावती (2) विशाखापट्टणम (3) गुंटुर (4) निजामाबाद

---

७७) सन २०१७ च्या निवडणुकीनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रत्यक्ष निवडून आलेल्या नगरसेवकांची एकूण संख्या

(1) २२५ (2) २२७ (3) २३० (4) २५०

---

७८) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९९६ च्या तरतुदीअन्वये, लवादाच्या खालील निर्णय अंतिम व निर्णायक राहील आणि नियोजन प्राधिकरणासह सर्व पक्षांना तो बंधनकारक राहील.

(1) अंतिम योजनेत समाविष्ट केलेल्या अंतिम भूखंडाचे मूल्य निर्धारित करणे आणि कलम ९८ च्या उपबंधानुसार अशा भूखंडाच्या संबंधात प्राप्त होणारी वाढीव रक्कम निर्धारित करणे.

(2) कलम १०० मधील उपबंधानुसार एखाद्या व्यक्तीकडून आकारता येण्याजोग्या अंशदानातून यथास्थिती वजा करावयाची किंवा त्यात मिळवायची रक्कम ठरवील.

(3) सार्वजनिक प्रयोजनार्थ नेमून दिलेली किंवा राखीव ठेवलेली क्षेत्रे ही मालकांना किंवा योजनेतील रहिवाशांना पूर्णतः किंवा अंशतः लाभदायक आहे किंवा कसे हे ठरविणे.

(4) धार्मिक किंवा धर्मादाय कारणासाठी वापरलेल्या भूखंडाच्या संबंधात मंजूर करण्यात येईल असे अंशदान देण्यातून जी कोणतीही सूट देण्यात येईल अशी सुटीची रक्कम ठरवील.

---

७९) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ मधील तरतुदीनुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्बांधणी उपकर हा खालील बाबीच्या टक्केवारी दराने आकारण्यात येतो.

(1) जमिनीची किंमत

(2) संबंधित इमारत किंवा जमीन वा तिचा भाग यांचे करयोग्य मूल्य

(3) इमारत बांधकामाची किंमत

(4) जमीन व इमारत बांधकाम यांची एकूण किंमत

---

८०) सन २०१४ मध्ये जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर

(1) दिल्ली – भारत (2) टोकियो – जपान (3) शांघाय – चीन (4) कोलकत्ता – भारत

---

८१) ध्वनी प्रदूषण (विनियम व नियंत्रण) नियम, २००० नुसार दिवसाचे वेळी रहिवास क्षेत्रासाठी सभोवतालच्या वायू गुणवत्तेप्रमाणे आवाजाची मर्यादा

(1) २० डेसिबल्स (ए) लैक (2) ८५ डेसिबल्स (ए) लैक

(3) ७० डेसिबल्स (ए) लैक (4) ५५ डेसिबल्स (ए) लैक

---

८२) ...... या अधिनियमान्वये मुंबई महानगरपालिका संचलित होते.

(1) महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम

(2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम

(3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

(4) मुंबई महानगरपालिका अधिनियम

---

८३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम २२ मधील मजकूर कशाशी संबंधित आहे?

(1) नवनगर (2) प्रादेशिक योजना (3) नगर रचना योजना (4) विकास योजना

---

८४) जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत ''शहरी गरिबांना मूलभूत सेवा'' या उपयोजनेअंतर्गत खालील प्रकल्प अनुज्ञेय आहेत.

a) वेतन रोजगार योजना
b) रस्त्यांवरील दिवे
c) झोपडपट्टी सुधारणा व पुनर्वसन
d) इतर घटकांतून तयार होणाऱ्या मालमत्तांचे कार्यान्वयन व देखभाल

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (c) (2) वरील सर्व प्रकल्प (3) (b), (c) व (d) (4) (a), (b) व (c)

---

८५) मुंबई शहराचा समावेश नव्याने निर्माण करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यामध्ये सन ...... मध्ये करण्यात आला.

(1) १९५० (2) १९६६ (3) १९४७ (4) १९६०

---

८६) मानव विकास निर्देशांक ...... या अर्थतज्ज्ञाने विकसित केला.

(1) मेहबूब उल हक (2) डॉ. हमीद अन्सारी (3) अण्णा हजारे (4) पोपटराव पवार

---

८७) बृहन्मुंबईच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली–१९९१ च्या तरतुदीनुसार, राज्य शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी यांनी बृहन्मुंबई शहरात हाती घेतलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी संमती आवश्यक असलेल्या पात्र झोपडपट्टीवासीयांची किमान टक्केवारी

(1) ७०%
(2) ५१%
(3) झोपडपट्टीवासीयांची संमती आवश्यक नाही
(4) १००%

---

८८) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ आणि नियंत्रण) अधिनियम, २००१ नुसार दिनांक ...... रोजी अस्तित्वात असलेला गुंठेवारी विकास नियोजन प्राधिकरणा कडून नियमित करण्यास पात्र असेल.

(1) ३० एप्रिल, २००१ (2) १ जानेवारी, २००१ (3) ३१ डिसेंबर, २००१ (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

८९) जे.एन्.एन्.यु.आर.एम. (JNNURM) याचे विस्तारित स्वरूप काय आहे?

(1) जवाहरलाल नेहरू नोडल अर्बन रिव्ह्यू मिशन
(2) जवाहरलाल नेहरू नॅशनल युनियन रिन्नोव्हेशन मिशन
(3) जवाहरलाल नेहरू नॅचरल युनिफॉर्म रिसर्च मिशन
(4) जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्यूअल मिशन

---

९०) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या तरतुदीअन्वये, नियोजन प्राधिकरण त्यांचे अधिकार क्षेत्रातील क्षेत्राकरिता किंवा कोणत्याही भागाकरिता, खालील उद्देशासाठी एक किंवा अधिक नगर रचना योजना तयार करू शकतात.

a) अंतिम विकास योजनेतील प्रस्तावांची अंमलबजावणी
b) यापूर्वीच बांधकाम झालेल्या जमिनींबाबत
c) विकासाच्या मार्गात असलेल्या कोणत्याही जमिनीबाबत
d) प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेतील प्रस्तावांची अंमलबजावणी

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a)
(2) फक्त (c)
(3) (a) किंवा (b) किंवा (c)
(4) (b) किंवा (c) किंवा (d)

---

९१) न्यायिक अधिकाराचे मूलतत्त्व किंवा वैशिष्ट्य आहेत.

a) अधिकारांचे उद्दिष्ट
b) क्रिया किंवा सहनशीलता
c) विषय
d) बांधील व्यक्ती

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a) आणि (c) (2) फक्त (b) आणि (d) (3) फक्त (a), (d) आणि (b) (4) वरीलपैकी सर्व

---

९२) खालीलपैकी कोणी 'सामाजिक अभियांत्रिकी' (सोशल इंजिनिअरिंग) चा सिद्धांत मांडला ज्यानुसार कायद्याचे उद्दिष्ट हे समाजातील व्यक्तींमधील हित कलह सोडविणे तसेच त्यांचे व्यक्तिगत हित संबंध सुसंवादित करणे असे होय?

(1) रोस्को पाउंड (2) केल्सन (3) हुगो ग्रोशिअस (4) लिऑन डगीट

---

९३) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) नुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' (Public authority) मध्ये खालीलपैकी कोणकोणत्या प्राधिकरणाचा समावेश होतो?

(1) संविधानाद्वारे निर्मित प्राधिकरण
(2) संसदेने केलेल्या कायद्यानुसार निर्मित प्राधिकरण
(3) राज्य विधिमंडळाने केलेल्या कायद्यानुसार निर्मित प्राधिकरण
(4) वरीलपैकी सर्व

---

९४) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२ नुसार मूलभूत अधिकारांचा भंग झाल्यास कुठे दाद मागता येते?

(1) उच्च न्यायालय (2) सर्वोच्च न्यायालय (3) जिल्हा न्यायालय (4) ग्रामीण न्यायालय

---

९५) खालीलपैकी कोणता पर्याय हा नैसर्गिक न्याय तत्त्व 'ऑडी ऑल्टरम पार्टम' चा सुयोग्य अर्थ दर्शवितो?

(1) व्यक्ती स्वतःच्या दाव्यात स्वतः न्यायाधीश राहू शकत नाही
(2) निर्णय देणारी अधिकारी व्यक्ती निःपक्षपाती असावी
(3) कोणत्याही व्यक्तीला त्याची बाजू न ऐकता शिक्षा फर्मावू नये
(4) वरीलपैकी एकही नाही

---

९६) व्यक्तीविधीमध्ये खालीलपैकी कशाचा समावेश होतो?

a) वारसा b) निर्वाह c) दत्तक d) विवाह

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे?

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a), (b), (d)
(2) फक्त (b), (d)
(3) फक्त (a), (c), (d)
(4) वरील सर्व (a), (b), (c), (d)

---

९७) आणीबाणीच्या काळात संविधानाचे खालीलपैकी कोणते अनुच्छेद स्थगित करता येत नाही?

(1) अनुच्छेद १४ (2) अनुच्छेद २० (3) अनुच्छेद १६ (4) अनुच्छेद १९

---

९८) मानवाधिकारांचे अधिक चांगल्याप्रकारे संरक्षण करण्यासाठी मानवाधिकार संरक्षण अधिनियम, १९९३ अंतर्गत खालीलपैकी कोणती प्रणाली उदघृत केली गेली नाही?

(1) राष्ट्रीय मानवाधिकार मंडळ
(2) राष्ट्रीय मानवाधिकार आयोग
(3) राज्य मानवाधिकार आयोग
(4) मानवाधिकार न्यायालय

---

९९) जेव्हा आणीबाणीची उद्घोषणा अंमलात असेल तेव्हा राष्ट्रपतीला आदेशाद्वारे (अनुच्छेद २० व २१ खेरीज) भारतीय संविधानाच्या भाग तीन अंतर्गत येणारे मूलभूत हक्क, खालील दिलेल्यापैकी कोणत्या अनुच्छेदा अंतर्गत निलंबित करता येईल?

a) ३६० b) ३६१ c) ३५८ d) ३५९

**पर्यायी उत्तरे –**

(1) (a) फक्त
(2) (b) फक्त
(3) (d) फक्त
(4) (a) आणि (b) फक्त

---

१००) राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवल धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही, असे खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदात नमूद केले आहे?

(1) २६ (2) २९ (3) २८ (4) २७

---

□□□

Study CIRCLE

## Answers

१) ७४ वी घटनादुरुस्ती कायदा १९९२ नुसार मोठ्या शहराची (महानगर) लोकसंख्या किती निश्चित करण्यात आली आहे ?

a) १० लाख किंवा अधिक
b) २० लाख किंवा अधिक
c) ५० लाख किंवा अधिक
d) १ कोटी किंवा अधिक

**पर्यायी उत्तरे –**

(1) फक्त (a)
(2) फक्त (b)
(3) फक्त (c)
(4) (a), (b), (c) आणि (d) हे सर्व

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1-1 | 2-4 | 3-4 | 4-3 | 5-4 | 6-2 | 7-1 | 8-3 | 9-4 | 10-2 |
| 11-1 | 12-2 | 13-2 | 14-3 | 15-4 | 16-2 | 17-2 | 18-4 | 19-3 | 20-4 |
| 21-2 | 22-3 | 23-2 | 24-2 | 25-3 | 26-3 | 27-1 | 28-3 | 29-3 | 30-4 |
| 31-4 | 32-3 | 33-3 | 34-3 | 35-1 | 36-2 | 37-1 | 38-1 | 39-3 | 40-2 |
| 41-4 | 42-4 | 43-3 | 44-2 | 45-4 | 46-4 | 47-1 | 48-1 | 49-3 | 50-2 |
| 51-2 | 52-1 | 53-3 | 54-1 | 55-1 | 56-1 | 57-3 | 58-1 | 59-4 | 60-1 |
| 61-4 | 62-3 | 63-4 | 64-1 | 65-2 | 66-3 | 67-3 | 68-1 | 69-1 | 70-2 |
| 71-1 | 72-4 | 73-4 | 74-1 | 75-4 | 76-1 | 77-2 | 78-2 | 79-2 | 80-2 |
| 81-4 | 82-4 | 83-4 | 84-3 | 85-4 | 86-1 | 87-3 | 88-2 | 89-4 | 90-3 |
| 91-4 | 92-1 | 93-4 | 94-2 | 95-3 | 96)-4 | 97-2 | 98-1 | 99-3 | 100-2 |

Study CIRCLE